आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता
९ फेब्रुवारी २०२५ रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- छत्तीसगडमधे सुरक्षादलासोबतच्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार, दोन जवानांना वीरमरण
- मणीपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांचा राजीनामा
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर
- हमास आणि इस्रायलमधल्या युध्दविरामाचा भाग म्हणून गाझाच्या मुख्य भागातून इस्त्रायली फोजांची माघार सुरु

**आणि**

- कटक इथं सुरु असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडचं भारतापुढं विजयासाठी ३०५ धावांचं आव्हान /भारताची दमदार सुरुवात

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षादलं आणि नक्षलवाद्यांमधे झालेल्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार झाले, तर सुरक्षा दलाचे दोन जवान शहीद झाले. इतर दोन जवान जखमी असून झाले त्यांची प्रकृती स्थिर आहे.

बिजापूर इथल्या इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरातल्या जंगलात आज सकाळी  सुरक्षा दलाच्या साडेसहाशे जवानांच्या पथकांनी शोधमोहिम सुरू केली. त्यावेळी नक्षलवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. सुरक्षा दलाच्या जवानांनी त्याला प्रत्युत्तर दिलं.

या चकमकीत ठार झालेल्या ३१ नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. ज्या ठिकाणी चकमक झाली तिथून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि स्फोटकांचा मोठा साठा जप्त केल्याचं बस्तर परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी यांनी सांगितलं. या चकमकीत शहीद झालेल्यांपैकी एक कर्मचारी, राज्य पोलीस दलाचा, तर दुसरा विशेष कृती दलाचा जवान होता.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बिजापूर इथं सुरक्षादलांनी नक्षलवाद्यांविरोधात केलेल्या कारवाईबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाधान व्यक्त केलं. पुढील वर्षी ३१ मार्च पर्यंत देशातील नक्षलवाद संपवण्याचं उद्दिष्ट्य असल्याचा पुनरुच्चार अमित शहा यांनी आज समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये केला.

याच पोस्टमध्ये शाह यांनी बिजापूर इथल्या नक्षलवाद्यांविरोधात झालेल्या कारवाईत वीरमरण आलेल्या दोन जवानांना श्रद्धांजली वाहत त्यांच्या कुटुंबाप्रती सहवेदना व्यक्त केल्या.

**<><><><><>**

मणीपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. गेल्या महिनाभरात मणीपूरमध्ये पुन्हा अशांततेनं डोकं काढल्यामुळे तसंच पक्षांतर्गत घडामोड़ीच्या पार्श्वभूमीवर सिंग यांनी आज राज्यपाल अजयकुमार भल्ला यांच्याकडे राजीनाम्याचं पत्र दिलं. त्याआधी आज दुपारी दिल्लीत पक्षनेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची त्यांनी भेट घेतली.

दरम्यान, मणिपूर विधीमंडळाचं अधिवेशन उदयापासून सुरु होत आहे. या अधिवेशनात बिरेन सिंग यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारवर प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस, अविश्वास प्रस्ताव दाखल करणार असल्याच्या हालचालींसंदर्भात काल सिंग यांनी सर्व भाजपा आमदारांची बैठकही घेतली होती.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव झाल्यानंतर मुख्यमंत्री आतिशी यांनी आज नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांची भेट घेऊन त्यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. नव्या सरकारची स्थापना होईपर्यंत आतिशी काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांशी आर्थिक, तंत्रज्ञानात्मक आणि धोरणात्मक भागीदारी दृढ करणं हा या दौऱ्याचा हेतू आहे. १० ते १२ फेब्रुवारी रोजी ते फ्रान्समधे कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेत उपस्थित राहतील, तसंच अनेक द्विपक्षीय चर्चांमधे सहभागी होतील. मार्सेली इथं सुरू होत असलेल्या भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाच्या उद्घाटन समारंभालाही ते हजेरी लावणार आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही काही लोकांची किंवा कंपन्यांची मक्तेदारी बनू नये याची भारताला चिंता आहे, असं भारताचे फ्रान्समधले राजदूत संजीव कुमार

सिंगला म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्ता सुरक्षित, सर्वसमावेशी असणं आवश्यक आहे असं ते म्हणाले.

फ्रान्सची भेट आटोपून १२ फेब्रुवारीला प्रधानमंत्री अमेरिकेला रवाना होतील. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर काही आठवड्यातच प्रधानमंत्री या देशाला भेट देत असल्यानं, त्यांचा अमेरिका दौराही फ्रान्सइतकाच महत्त्वाचा मानला जात आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी अकरा वाजता आठव्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. दिल्लीत भारत मंडपम इथं हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाचे थेट प्रसारण दूरदर्शन, आकाशवाणी तसंच सर्व वृत्त वाहिन्यावरून होणार आहे.

<><><><><>

कटक इथं सुरु असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडनं भारतापुढं विजयासाठी ३०५ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

इंग्लंडनं  नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. सामन्यातला शेवटचा चेंडू बाकी असताना त्यांचा डाव संपला. मात्र त्यांनी ३०४ धावा केल्या. फिल्सोल्ट आणि बेॅन डकेट यांनी पहिल्या गड्यासाठी ८१ धावांची भागीदारी केली.

ज्यो रुटनं ६९, तर बेॅन डकेटनं ६५, धावा केल्या. लियाम लिविंगस्टोननं ४१, तर हॅरी ग्रोथनं ३१ धावांचं योगदान दिलं. भारतातर्फे रविंद्र जडेजानं ३ गडी बाद केले.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना भारतानं दमदार सुरुवात केली. करेणधार रोहित शरमा आणि शुभमन गिल यांनी पहिल्या गड्यासाठी १३६ धावांची भागीदारी केली. शुभमन गिल ६० धावा करुन बाद झाला

रोहीत शर्मानं अर्धशतक केलं आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या २४ षटकात २ बाद १७६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

हमास आणि इस्रायलमधल्या युध्दविरामाचा भाग म्हणून गाझाच्या मुख्य भागातून इस्त्रायली फौजेच्या तुकड्या आजपासून परतायला लागल्या आहेत. इस्रायली अधिकाऱ्यांनी ही माहिती देताना या युध्दविरामाच्या करारानुसार आपण पावलं उचलत असलो तरी या कराराची पुढची वाटचाल ही दोन्ही बाजूंवर अवलंबून असल्याचं नमूद केलं. युद्धविरामाचा भाग म्हणून पॅलेस्टिनी नागरिकांना नेतझरिम हद्द ओलांडून उत्तरेकडच्या भागात जाण्याची परवानगी इस्रायलने दिली आहे. गेले पंधरा महिने सुरु असलेल्या या संघर्षाला विराम मिळाल्याच्या भावनेने अनेक पॅलेस्टिनी पायी किंवा गाड्यांनी परतत आहेत. गाझातून इस्रायली फौजा पूर्णपणे माघारी गेल्यावर कराराच्या दुसऱ्या टप्प्यात उर्वरित ओलिसांची सुटका केली जाईल.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या तेजस शिरसे यानं पुरुषांच्या १०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत आणि आंध्र प्रदेशच्या ज्योती याराजी हिनं महिलांच्या ११० मीटर अडथळ्यांच्या

शर्यतीत सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावलं आहे. या दोघांनी २०२२ आणि २०२३मध्येही राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं होतं.

या स्पर्धेमधे महाराष्ट्राने सर्वाधिक ११३ पदकं जिंकली असून त्यात २५ सुवर्ण, ४२ रौप्य आणि ४६ कांस्य पदकांचा समावेश आहे. सध्या महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असून ४२ सुवर्ण पदकांसह सेना दलं पहिल्या तर ३० सुवर्ण पदकांसह कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

बाबा आमटे यांनी सुरु केलेल्या आनंदवन प्रकल्पाला दहा कोटी रुपयांचा कॉर्पस फंड देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली. वरोरा इथं आनंदवनात महारोगी सेवा समितीच्या पंचाहत्तर वर्षपूर्ती कृतज्ञता मित्र मेळाव्यात ते बोलत होते.  आनंदवनात पाचशेजणांसाठी निवासी रुग्णकेंद्र उभारण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. शासकीय अनुदानाच्या रकमेत २०12 पासून कोणतीही वाढ झालेली नाही असं सांगत अनुदान वाढवल्याची घोषणाही त्यांनी केली.

उद्योग मंत्री उदय सामंतही यावेळी उपस्थित होते. दिव्यांगांसाठी देशातल्या पहिल्यावहिल्या कौशल्य विकास केंद्राची स्थापना आनंदवनात करण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

//<><><><><>//